जा.क्रं.नावाशमनपा/नसका/सिआर-02/2019
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
दिनांक :- 28.05.2019

# <u>विशेष सर्वसाधारण सभेची सुचना</u>

**महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर अणि उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे (सुधारणा) नियम 2006 मधील नियम क्रमांक 3(1) अन्वये**

महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियमा 2006 मधील नियम क्रमांक 3(2) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी ठरवुन दिल्या प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची **विशेष सर्वसाधारण सभा दिनांक 01/06/2019 रोजी सकाळी 11.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील डॉ. कै. शंकररावजी चव्हाण सभागृहात आयोजीत करण्यात अली आहे.**

सदर सभेच्या कामकाजाची विषय पत्रिका तपशील खालील प्रमाणे आहे. करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत वेळी उपनिर्दीष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**
**( स. अजितपालसिंघ संधु )**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति,**
**श्री / श्रीमती** ------------------------------------------------
स. सदस्य / सदस्या,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

<u>विषय पत्रिका</u>

**विषय क्रं. 01**

भवरे शिलाबाई किशोर यांनी महापौर यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला असल्यामुळे रिक्त झालेल्या उर्वरीत कालावधीसाठी महापौर या पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19(5) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणुक घेणे ) नियम 2005 व ( सुधारणा ) नियम 2006 अन्वये निर्वाचीत सदस्या मधुन **मा. महापौर** यांची निवड करणे बाबत.

महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य-उप-विभाग आदेश व अधिसुचना क्रमांक एमसीओ-2016/प्र.क्र.300/ नवि-14 दिनांक 27 मार्च 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या **महापौर पद हे अनुसूचित जाती (महिला) करीता आरक्षित ठेवण्यात आलेले आहे.**

**<u>टिप</u> :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19 (1ब) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थितीत, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौराच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 (2001 चा महा.23) यांच्या तरतुदींना अनुसरुन सक्षम प्राधिका-यांने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक 31 डिसेंबर 2017 किंवा त्यापुर्वीचा असेल, त्या बाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत –

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र सादर करीन

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल.

**स्वाक्षरीत/-**
**( स. अजितपालसिंघ संधु )**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**